# पोलीस आयुक्तालय अमरावती शहर

## दैनंदिन गुन्हे - दिनांक १४/०७/२०२४

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र ११८(१), ३५२ बी. एन.एस. २०२३ प्रमाने | टांगा पाडाव चौक अमरावती | दि. १२/०७/२०२४ चे १९/०० वा ते २०/०० वा<br>दाखल दि. १३/०७/२०२४ चे ००/४२ वा | मोहम्मद अशर मोहम्मद अकबर कुरेशी वय ३२ वर्ष रा गवळीपुरा रतनगंज अमरावती | १)कलीम खाँ<br>२)कलीम खाँ यांचा मुलगा<br>रा. अमरावती | हकीकत अशा प्रकारे फिर्यादी हे नमुद घटना ता वेळी ठेल्यावर काम करित असतांना आमच्या ठेवल्यावर एक गि-हाईक आले होते त्या गि-हाईला आमच्या समोरील दुसरा तोस ब्रेड वाला नामे कलीम खाँ हा घुरावुन पाहत असल्याने त्यावर गि-हाईक त्याला म्हटले की,घुरावुन का पाहतो त्यावर तो आमच्या जवळ आला व म्हणाला की, नौकर भी कुछ नही कर सकता और उसका मालक भी कुछ नही कर सकता व त्याने लगेच शिवीगाळ केली व कलीम खाँ त्याचा मुलगा याने माझ्या डोक्यावर दगडाने मारले व डोक्यातुन रक्त निघाले त्यावर पो.स्टे ला नागपुरीगेट येथे गेलो असता पो.स्टे ला चापोका कुनाल १८२३ यांनी मला इलाजाकरिता इर्विन दवाखाना अम येथे भरती केले व आज रोजी ००/०५ वा दरम्यान पो.स्टे कोतवाली येथील पोहेका ब.न. १६५ व पोकाँ कांडलकर ८२७ यांनी पो.स्टे नागपुरीगेट येथील असुन एन.डी.ओ. सा यांना माहीती देवुन जख्मी यांचे बयाणावरुन व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र २६८/२०२४ कलम ११८(१), ११८(२), ३२४(२), ३५२ भा.न्या. संहीता २०२३ | ईतवारा बाजार अल बशिर च्या बाजुला अमरावती | घ.ता.वेळ दिनांक १२.०७.२०२४ चे २०.०० वा<br>दा.ता.वेळ दिनांक १३.०७.२०२४ चे ०१.१३ वा | उजैवफ खान कलिम खान वय २१ वर्ष व्यवसाय - ब्रेड तोस खारी विक्री रा. डॉ. अबरार दवाखाना च्या मागे नागपुरी गेट अमरावत | १. मोहम्मद अशर मोहम्मद अकबर कुरेशी<br>२. मोहम्मद अकबर कुरेशी रा. गवळी पुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचे वडील आपल्या दुकानात काम करत असतांना त्यांचे दुकानाचे बाजुला शंख हबीब यांचे दुकानावर काम करणारा मो. अजहर यांचे साबत वाद झाल्याने आरोपी मो.अजहर याने आपले वडील नामे मो.अकबर यांला घटनास्थळी बोलवुन फिर्यादी व त्यांचे वडील सोबत शिवीगाळ करुन मारहाण केली व रोडवर पडलेला दगड व काठी उचलुन फिर्यादी व त्यांचे वडील ला दगड व काठीने मारुन जख्मी केली अशा फिर्यादीचे जबाणी रिर्पोट वरुन व मेडीकल सर्टीफीकेट वरुन डी ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

➢ स्त्रि अत्यांचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १० |
| ०१ | राजापेठ अप क्र ४१६/२०२४ कलम ४९८(अ), ३४ भादंवि | पो.स्टे. राजापेठ हद्दीत | घ.ता. वेळ ३०/१२/२३ चे पुर्वी<br><br>दा.ता.वेळ - १३/०७/२०२४ चे १४.५१ वा. | एक महिला | फि. चे नातेवाईक | हकीगत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी पो. स्टे. ला लेखी अर्ज दिला की तिचे पती व सारसकडील मंढळी हे तिला शाररिक व मानसिक त्रास देतात सदर अर्जाची नोंद घेवुन सदरचा अर्ज हा कोंटूंबिक कलहाबाबत असल्या कारणाने महिला सेल येथे समुदेशनाकरिता पाठविण्यात आला होता परंतु त्याच्यामध्ये आपसी समज्योता न झ ााल्याने महिल सेल यांचे आदेशाने व. पो. नि. सा. आदेशाने फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे<br>नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पो.स्टे. नादंगावपेठ अप क्र. २२९/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी | रहाटगाव शेत शिवारा तील अश्विनी फॉर्म हाऊस ,ड्रिमलँन्ड च्या बाजुला नांगावपेठ | दि.१०/०६/२०२४ चे १२.०० वा.ते दि.११/०६/२०२४ चे ०८.०० वा.दरम्यान<br>दा.ता.वेळ<br>दि.१३/०७/२०२४ चे १९.३० व ा. | रणधीर पंडीतराव कापसीकर वय ३५ वर्ष धंदा शेती रा.संजय गांधी नगर क्र. २ अमरातवती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हा रहाटगाव शेत शिवारातील अश्विनी फॉर्म हाऊस ,ड्रिमलँन्ड च्या बाजुला रवीद्र धेळे रा.शंकर नगर अमरावती यांचे मालकीचे शेतात बाधलेल्या फॉर्म हाऊस असुन फिर्यादी हा त्या शेताची लागवड करुन उदनिर्वीह करतो.त्या शेतात एक छोटा अश्विनी फॉर्म हाऊस मालकाने बांधलेला असुन त्यामध्ये एल.ई.डी.टि.व्ही., वायफाय राऊटर.फ्रिज,ए सि.व किचन ओटा असुन , फिर्यादी हा. दि. १०/०६/२०२४ चे १२.०० वा.दरम्यान शेतातुन काम करुन घरी परत गेला व दि. ११/०६/२०२४ चे ०८.०० रोजी शेतात गेला असता शेतातील फॉर्म हाऊस मधील एल.ई.डी.टि.व्ही. ५५इंच कि.अ.१०,००० रु.व वायफाय राऊटर कि.अ.७०० रु.एकुण असा १०,७०० रु.चा माल दिसुन आला नाही.सदर माल कोणातरी अज्ञान चोराने चोरुन नेला .अशा फि च्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे<br>नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अम अप क्र ६२५/२०२४ कलम ३०३(2) बी. एन. एस | शुक्रवार बाजार अमरावती | दि.१२/०७/२०२४ चे १८.३० वा<br><br>दि.१३/०७/२०२४ चे ००.१० वा | सुनिल देवकर डकरे वय ३०वर्ष रा. दसरा मैदान वसंतराव नाईक नगर अमरावती | अज्ञात | हकितत अशा प्रकारे आहे कि दि.१३/०५/२०२३ रोजी जागेश्वर मुबई ६०येथुन तिरूपती मोबाईल ॲन्ड वॉच दुकानामधुन oppo find n2 fillip कंपनीचा मोबाईल imei no. 869315060216654 चा कि. अंदाजे ८९,९९९/रू लोन वर खरेदी केला होता व तो मोबाईल फि वापरत होता त्यामध्ये सिम जिओ ओडाफोन असे आहे नमुद घटना ता. वेळी ठिकाणी सुमारात फि हे शुक्रवार बाजारात भाजी घेण्याकरिता गेले असता भाजीपाला घेतेवेळी फि जवळ असलेला नमुद कंपनीचा मोबाईल हा. ०६.३०च्या सुमारात कोणीतरी अज्ञात चोराने शर्टाच्या खिशात ठेवलेले मोबाईल चोरून नेला.त्याची सध्याची कि. ७०००० रू एवढी अहे. अशा फिच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो.स्टे गाडगेनगर अमरावती शहर अप क्र.६११/२०२४, कलम ३०५ (अ) बी एन एस | विलास नगर गल्ली नं.४ अमरातवी | गु.घ.ता.वेळ दि.०७/०७/२०२४ चे ००.००वा. माहीती गु.दा.ता.वेळ दि.१३/०७/२०२४ चे १७.१५ वा. | प्रमोद माणिकराव तायडे वय ६२ वर्ष रा. विलास नगर गल्ली नं.४ अमरातवी | शुभम नावाचा इसम रा.माहीत नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की,नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी अर्जदार , यांच्या पत्नीची सोन्याची दोन पदरी मोहनमाळ वजन २९.१८० ग्रॅम कि.१,७०,०००/- रु. ची मोहनमाळ घरात हॉलमधिल सिलिंग ला असलेले इलेक्ट्रिक चे डमी प्लेट चे आत मध्ये ठेवली होती अर्जदार यांचे घरी हॉलची पी ओ पी मध्ये इलेक्ट्रिक चे बल्ब लावायचे असल्याने अर्जदार यांनी दि.०२/०७/२०२४ रोजी पासुन शुभम नावाचा इसम याला इलेक्ट्रिक चे काम येते व मी चेह-याने ओळखतो म्हणुन मी त्याला काम दिले व दि.०७/०७/२०२४ रोजी काम पुर्ण झाले दि.१०/०७/२०२४ रोजी मी बल्ब लावायला गेलो व मला आठवले की इलेक्ट्रिक चे डमी प्लेट चे आत मध्ये सोन्याची मोहनमाळ ठेवलेली आहे ती मी बघायला गेलो तर त्या ठिकाणी दिसली नाही .मला माझ्या घरी इलेक्ट्रिक चे काम करायला आलेला शुभम याचे वर संशय आहे .करीता तक्रार देत आहे. हाच माझा जबाणी रिपोर्ट असुन तो माझे सांगणे प्रमाणे माझ्या समक्ष संगणकावर टंकलिखित केला प्रिंन्ट काढल्यावर वाचुन पाहीला सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ वाहण चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ | १० |
| ०१ | पो.स्टे गाडगेनगर अमरावती शहर अप क्र.६१०/२०२४, कलम ३०३ (२) बी एन एस | महेन्द्र कॉलनी अमरावती चित्रा मळसणे याच्या घराजवळ अमरातवी | गु.घ.ता.वेळ दि.०९/०७/२०२४ चे २२.००वा. ते दि.१०/०७/२०२४ चे ०३.४०वा.दरम्याण माहीती गु.दा.ता.वेळ दि.१३/०७/२०२४ चे १६.०१ वा. | दिनेश धनराज मानेकर वय ४३ वर्ष रा.समता नगर वलगाव अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की,नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी अर्जदार हिरो कंपनीची स्पेन्डर प्रो.सिलव्हर काळ्या रंगाची गाडी क्र.एम एच २७ बी जे ६१९८ ही गाडी पाउस सुरु होता म्हणुन नमुद ठिकाणी उभी केली अर्जदार हे रात्री ०३.४०वा.गाडी जवळ गेले तर गाडी त्याना त्याची गाडी दिसली नाही कोणी तरी अज्ञात ने खुल्या परीसरातुन चोरुन नेली गाडी ची कि.अं. २०,०००/- रु.आहे गाडी चा चेसिस क्र.एम बी एल एच ऐ १० बी एफ ई एच बी ६९१६१ ,इंजिन क्र.एम ऐ १०ई आर एफ एच बी ४८६६१ जुनीवापरती चार वर्षा आधी छत्तीस हजार रुपयाची विकत घेतली होती अशा वर्णाची गाडी हरविली आहे सदरची गाडी ही आज पर्यंत शोधली मिळुन आली नाही ,अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात / फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | राजापेठ अप क्र ४१७/२०२४ कलम ४२० भादंवि | चवरे नगर अमरावती | दि १३/०६/२०२४ रोजी पासुन ते आजपावेतो दाखल ता वेळ -दि १३/०७/२४ चे १९/०४ वा | हरीदास शंकरराव पाटील वय ४५ वर्ष रा राठठी कमला नेहरू नगर बजाज हॉस्पीटल समोर छत्री तलाव रोड अमरावती | रूपेश गवई | हकीगत अशा प्रकारे आहे की यातील आरोपी यांनी फिर्यादीस एक स्कीम सुरू आहे असे म्हणुन आधार कार्ड व बँकेचे पासबुक व आपल्यालाल दोन हजार रूपये मिळते आपल्याया फक्त गाडीच्या शोरूममध्ये जावुन फोटो काढायचा आहे नमुद घटवना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादी यांचे पाच ते सहा कागदावर सह्या घेवुन सुझुकी कंपनिच्या गाडीसमोर चाबी देतांनी फोटो काढले व आरोपी गाडी घेवुन निघुन गेला . अदाडे ३ ते ४ दिवसापुर्वी गाडीची आर सी आली तेव्हा त्याना समजले की नमुद आरोपी याने दोन हजार रूपयाचे आमिष देवुन फि यांच्या नावावर असलेले आधार कार्ड व पासबुक घेवुन सुझुकी कंपनिचे बर्गमन स्ट्टि मॅट ब्लॉंत रंगाची गाजी क्र एम एच २७ डी एस १५८२ ही घेवुन दुस-या व्यक्तीला परस्पर विकुन फि याची फसवणुक केली आहे . अशा व. पो. नि. सा. आदेशाने फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो.स्टे. सायबर अमरावती शहर अप.नं. ३८/२०२४ कलम ४१९,४२०, भा.द.वि. सहकलम ६६(क),६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा | अमरावती | दि. १८/०५/२०२४ चे ००.०० वा. ते दि. ११/०६/२०२४ चे ००.०० वा. दरम्यान<br>दि. १२/०७/२०२४ चे १९.३७ वा. | एक महिला | मो.क्रं. चा धारक व फोन पे चा धारक | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद आरोपीने फिर्यादीला नटराज पेन्सील पॅकिंग चे वर्क फ्रॉम होम चे नावाने ९३,३९४ रू व KBC कंपनी कडुन लकी ड्रॉ मध्ये बक्षीस लागला आहे असे बोलुन वेगवेगळी कारणे सांगुन फिर्यादीला नमुद मो क्र चे खात्यात पैसे भरण्यास भाग पाडुन फिर्यादीची ऑनलाईन एकुण २,८७,८१९ -रुपयाने आर्थिक फसवणुक केली अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **इतर :- ०४**

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र २५४/२०२४ कलम ८ सी,)२२) बी,)२९ एन.डी.पी.एस.अँक्ट १९८५ सहकलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका प्रमाने | आरोपीचे राहते घर गुलीस्ता नगर अमरावती | दि. १२/०७/२०२४ चे २१/४५ वा ते २३/३० वा दरम्याण<br>दाखल दि. १३/०७/२०२४ चे ०२/३७ वा | सपोनि मनिष मनोहराव वाकोडे वय ४५ रा गुन्हे शाखा युनीट क्र १ अमरावती शहर | १)अहसान खान वल्द हसन खान वय २३ रा गुलीस्ता नगर अमरावती<br>२) हसन खान खेजु खान वय ५३ रा गुलीस्ता नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी मिळालेल्या गुप्त माहीती वरुन पो.स्टाफ व शासकीय पंच ,शासकीय कँमेरा ,वजन काटा यांचे सह नमुद घटना ता वेळी व ठिकाणी नमुद आरोपीच्या राहत्या घराची घर झडती घेतली असता त्याचे घरामध्ये असलेल्या लोखंडी आलमारीची पाहणी केली असता ४ फुटरुंदी आणी ६ फुट ६ इंच एवढी आहे सदर आलमरीचे दर्शनी भागावर ७ कप्पे व एक असुन आरसा लागला असलेल्या कप्याचा दरवाजा उघडुन पाहणी केली असता त्यामध्ये आणखी तिन कप्पे व एक लाँकर असुन लाँकरची पाहणी केली असता त्यामध्ये एका प्लास्टीक पाउचमध्ये पाढ-या रंगाचे पावडर आणी तिन कप्पे व एक छोटा वजन काटा व रिकामे प्लास्टीक पाउच ठेवलेले मिळुन आले त्याचप्रमाने आलमारीच्या वरील भागावर चादरीमध्ये पाच तलवारी आणी एक फरशा असे ६ घातक शस्त्र मिळुन आले त्याप्रमाने १)कि.अ.१,२०,००० रु पाढ-या रंगाचा एमडी.नावाचा अंमली पदार्थ असलेले प्लास्टीकचे एक छोटे पाउच ज्यांचे एकुण वजन ४०.०२० ग्रँ.सिलबंद केल्यावर लिफाफ्याचे वजन ४८.७७० ग्रँ २) कि. अं. ००.००रु रिकामे प्लास्टीकचे पाउच ३) कि. अं. १००० रु. एक छोटा इलेक्टीक वजन काटा ४)किअ. २००० रु एक स्टीलची मोठी तलवार जीजी एकुण लांबी ४४इंच पात्याची ३०.२५ इंच व रुदी ३ इंच,पाते एका बाजुने धारदार व दुस-या बाजुने खाचे असलेले निमुळते टोकदार मुठीची लांबी १३.७५ इंच मुठस्टीलची गोलाकार ५) किअ.२००० रु एक स्टीलची तलवार जीची एकुण लांबी ३६ इंच पात्याची लांबी २८.२५ इंच व रुदी २इंच पाते एका बाजुने धारदार व दुसया बाजुने बोथड निमुळते टोकदार ,मुठीची लांबी ७.७५ इंच, मुठ गोलाकार त्यावर लाल काळ्या रंगाची प्लास्टीक टेप पट्टी गुडाळणी असलेली ६) कि.अ. २००० रु एक स्टीलची मोठी तलवार जीजी एकुण लांबी ४१.७५ इंच पात्याची लांबी ३२.५०इंच व मधोमध रुदी २ इंच आणी टोकाचे बाजुला २.५० इंच पाते एका बाजुने धारदार व दुस-या बाजुने बोथड निमुळते टोकदार , मुठीची लांबी ९.२५ इंच ७) कि.अ. २००० रु एक लोखंडी तलवार जीजी एकुण लांबी ३२.२५ इंच पात्याची लांबी २८ इंच व मधोमध रुदी १.२५ इंच पाते एका बाजुने धारदार व दुस-या बाजुने बोथड निमुळते टोकदार पात्यावर सिरोही की तलवार ३० साल की गँरंटी असे नमुद असलेली मुठीची लांबी ४.२५ इंच ८) किअ.२००० रु एक लोखंडी तलवार जीजी एकुण लांबी ३६ इंच पात्याची लांबी ३२ इंच व मधोमध रुदी १.२५ इंच |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पाते एका बाजुने धारधार व दुस-या बाजुने बोथड निमुळते टोकदार ,मुठीची लांबी ३२ इंच व मधोमध रुदी १.२५ पाते एका बाजुने धारधार व दुस-या बाजुने बोथड निमुळते टोकदार मुठीची लांबी ४इंच ९) कि. अ.१००० रु एक लोखंडी रॉड व स्टीलचे अर्धगोलाकार पाते असलेला फरशा ज्याचे रॉडची लांबी ३६.५० इंच पात्याचा व्यास १०इंच त्रीज्या ५ इंच पाते धारदार असलेला एकुण कि. १,३२,००० रु असा पंचा समक्ष जप्त करण्यात आला वरुन सदर घटनास्थळा वरुन ताब्यात घेतलेला आरोपीनामे १)अहसान खान वल्द हसन खान वय २३ रा गुलीस्ता नगर अमरावती व त्याचा फरार झालेला साथीदार नामे हसन खान खेजु खान वय ५३ रा गुलीस्ता नगर अमरावती यांचे कृत्य कलम ८ (सी,)२२) बी,)२९ एन.डी.पी. एस.अँक्ट १९८५ सहकलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका प्रमाने अपराध होत असल्याने त्याचे विरुद्ध फिर्यादीचे कायदेशीर कार्यवाही वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | राजापेठ अप क्र ४१५/२०२४ कलम २९४,५०६(ब) भादंवि | साईनगर अमरावती | घ.ता. वेळ २९/०५/२०२४ चे ११.३५वा<br>दा.ता.वेळ - १३/०७/२०२४ चे १४.१४ वा. | बाळासाहेब विष्णुपंत तळोकार वय ५५ वर्ष रा. साईनगर अमरावती | रोशन थोरात रा. खोलापुर ता. भातकुली जि. अमरावती | हकीगत अशा प्रकारे आहे की वरिल नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीने त्याचा मो. क्र. यावरून फिर्यादीचे मो. नं. वर मँसेज आला व त्याने मँसेजमध्ये म्हटले की माझे कामाचे तुमचेवर १४,००० रू. आहे. मला आताच्या आता पैसै पाहिजे असे मँसेज केले फिर्यादीने त्यास समजावुन सांगितले की माझ्यावर तुझे कोणतेच पैसे नाही मी तुला कसे पैसे देणार याकारणावरून त्याने वारंवार मँसेज करून अश्लिल भाषेत माझे पैसे हरामाचे आहे काय तुले सांगतो कस असते तसेच घरि येवुन बंदुकिने गोळी मारून जिव घेतो. अशी धमकी दिली. अशा फर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ०३ | पो स्टे सिटी केतवाली अम शहर अप क्र २७०/२०२४ कलम ११५(२)BNS , सह कलम ७५, ८२ अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५ | मराठी प्रायमरी शाळा अमरावती | घ ता वेळ - दि १२/०७/२०२४ चे ०७.४५ वा ते १३.३० वा दरम्यान<br>दाखल ता वे ळ - दि १३/०७/२०२४ चे २१.४६ वा | एक महिला | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हिची मुलगी मराठी प्रायमरी शाळा शिक्षण घेत आहे. दि ०१/०७/२०२४ रोजी पासुन शाळा सुरु झाली असुन शाळेचा वेळ हा सोमवार ते शुक्रवार सकाळी ०७.४५ वा पासुन दुपारी ०१.३० वा आणि शनिवारी ०७.४५ वा ते ११.०० वा पर्यत असा आहे. फिर्यादी हिची मुलगी ही शाळेतुन घरी आल्यावर रोज फिर्यादी यांना सांगत असे की आमच्या वर्गातील मॅडम ही आम्हाला काही कारण नसतांना चापट बुक्यांनी मारत आहे. फि ची मुलगी ही डिप्रशन मध्ये राहत आहे असल्याने तिला फि ने शाळे विषयी विचारपुस केली असता ती घाबरलेल्या अवस्थेत काहीच सांगत नव्हती. दि १२.०७.२०२४ रोजी फि ची मुलगी ही शाळेतुन घरी परत आल्यावर रडत रडत फि ला सांगीतले की आज मला मॅडम (आरोपी) ने मला मारहाण केली फि ने का मारले विचारले असता मी स्पेलिंग जवळ जवळ लिहीले त्यामुळे माझा उजव्या बाजुचा गालाला जोरात चिमटा घेवुन ओढला व मान खाली करुन पाठीवर थापड मारली ज्यामुळे मुलीचा पाठीवर व्रण आले होते . त्यामुळे ती शाळेत जाण्यास घाबरत आहे, यावरुन फिर्यादी हिने मुलीचे मॅत्रीणी यांच्या आई ला फोन करुन विचारले असता त्यांनी सुध्दा सांगीतले की मॅडम ही आमच्या मुलीला सुध्दा मारहाण करते. करीता फिर्यादी व सोबत मुलीचे मॅत्रीणी यांच्या आई असे व इतर पालक आज दि १३.०७.२०२४ रोजी सकाळर ११.३० वा दरम्यान प्रायमरी शाळा अमरावती येथे जावुन तेथील मुख्याध्यापक यांची त्यांचे कार्यालयात जावुन भेट घेतली व नमुद आरोपी हिची तक्रार केली असता आरोपी ही आज शाळेमध्ये हजर नव्हते व मुख्याध्यापक यांनी फिर्यादी यांनी तक्रार ऐकुण न घेता आरोपी हजर आल्यावर आम्ही पाहुन घेवु काय करायचे आहे तुम्ही आम्हाला सांगु नका काय करायचे आहे तुम्ही करुन घ्या असे फिर्यादीस व सोबत गेलेल्या पालकास म्हटले. करीता आम्ही नमुद आरोपी (मॅडम) यांनी आमच्या मुलीला क्रुरपणे वागणुक देवुन शारीरीक व मानसिक त्रास देवुन हात बुक्यांनी मारहाण करत असल्याने त्यांचे विरुध्द कायदेशिर तक्रार देत आहे अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने सदर गुन्हा नोंद |

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ०१ | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर | अप क्र २६९/२०२४ कलम ६५(अ) म दा का | प्रभात टॉकीज अमरावती | दि १३/०७/२०२४ चे १५.२० वा | दि १३/०७/२०२४ चे १९.१९ वा | फिरोज खान नुर खान ब न १०९६ गुन्हे शाखा युनीट क्र १ अमरावती शहर | अनील कैलाश कोठे वय ३८ वर्ष रा सारवडी ता कारंजा जि वर्धा समजपत्रावर रिहा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व सोबत स्टॉप हे नमुद घ ता वेळी पो स्टे सिटी कोतवाली हददीत जुगार रेड करणे कामी प्रेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहीती मिळाली की एक इसम बापट चौक कडुन प्रभात चौक कडे खांदयावर प्लास्टीक पोत्यामध्ये देशी दारु वहातुक करुन घेवुन जात आहे अशा माहीती वरुन दोन पंच सोबत घेवनु नमुद घटनास्थळी सापळा रचला असता एक इसम प्लास्टीक पोता खांदयावर घेवुन येतांना दिसता त्यास थांबवुन पोत्याची पाहणी केली असता त्यात दोन बॉक्स देशी दारु चे दिसुन आले त्यामध्ये १९८ बॉटल देशी दारु बॉबी संञा कंम्पनीची ९० एम एल किं अं ९९००/- रु चा माल मिळुन आला . करीता सदर आरोपीवर कलम ६५(अ) म दा का प्रमाणे गुन्हा नोंद |

➢ अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटाा स्थळ | मृतकाचे ाांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पोस्टे वलगाव अम.शहर. मर्ग क्र.28/2024 कलम 194 BNSS प्रमाणे दाखल | साऊर, मृतकयांचेराहतेघर दाखलदि.13/07/2024 20/53 वा. | योगेश पंडीत राव इंगोले वय 42 वर्षरा.साऊर ता.भातकूली | सुभाष पंडीतराव इंगोलेवय 40 वर्ष रा. साऊर ता.भातकूली | गळफास घेवेन आत्माहात्या केली. | हकिकतअशा प्रकारे आहे की दि.12/07/2024 चे रात्री 10.00 वा.दरम्यान मी जेवन करून झोपलो. रात्री 12.30 वा.दरम्यान माझे पुतणे ओमप्रकाश व तुषार यांनी मला आवाज दिला. त्यांनी मला सांगीतले की माझे बाबा ने फाशी घेतली आहे. तसाच मी भावा चे घरात आलो. तर माझा भाऊ जमिनीवर पडला होता. घराचे आडव्या नाटीला पांढ-या रंगाची दोरी लटकत होती. माझा भाऊ योगेश काही हालचाल करि तनव्हता . माझे भावाची पत्नी आठवर्षा पासून सोडून गेली होती. त्यामुळे तो खुप दारू प्यायचा. दारूच्या नशेतच त्याने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. माझे भावा चे मृत्यु मध्ये मला दुसराकोनताच ही संशय नाही. वरिल प्रमाणे माझा रिपोर्ट आहे. सांगणे प्रमाणे बरोबर लिहीला आहे. अशा जबानी रिपोर्ट वरून सदर प्रमाणे मर्ग दाखल करून |